# भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा गणपुर रै

## तालुका-चामोर्शी,जिल्हा- गडचिरोली.

## शैक्षणिक सत्र २०२३-२४

### 1) नवोपक्रमाचे शीर्षक

"किमया अक्षर-शब्द समुहाची"
(वाचन संस्कृती सुधारण्यासाठी मिळाले बळ)

### 2) नवोपक्रमाची गरज व महत्त्व.

शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 नुसार गुणवत्तापूर्ण शिक्षण हा प्रत्येक बालकाचा मुलभूत अधिकार झाला आहे,गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड आणि वाचन संस्कृती रूजविणे गरजेचे आहे.त्यामध्ये हा पहिला टप्पा पार पाडण्यासाठी या टप्प्यावर काम करणे आवश्यक असते. 2 री च्या विद्यार्थ्यांचा शब्द साठा वाढविण्यासाठी आणि त्यांना अधिक सक्षम करण्यासाठी नाविण्यपूर्ण अक्षर शब्द समुह विकसित केल्या जाऊ शकतो. त्यासाठी किमया अक्षर शब्दांची यासारखे नवोपक्रम घेणे गरजेचे आणि महत्त्वाचे आहे.

सदर कार्यात शिक्षकांची भूमिका जितकी महत्वाची आहे तितकीच महत्त्वाची भूमिका विषय साधनव्यक्ती यांची सुद्धा आहे. अक्षर शब्द वाचन व लेखन हे किमान कौशल्य विद्यार्थ्यांच्या अंगी असावेत ही गरज लक्षात घेऊन नाविण्यपूर्ण उपक्रम राबविणे महत्त्वाचे ठरते.

इयत्ता पहिलीनंतर अक्षर समुह विकसित झाल्यानंतर इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांचा शब्द साठा अधिक सक्षम करण्यासाठी नाविण्यपूर्ण अध्यापन पद्धतीने शब्द समुहाची तयारी केल्या जाऊ शकतो.त्यामुळे मुलांना दररोज व्यक्त होण्यासाठी अक्षर शब्दांची किमया हा नवोपक्रम शिक्षकांच्या सहकार्याने हाती घेण्यात आला.

दररोज नवनवीन शब्दांची तयारी व शब्दांची जुळवाजुळव करून ब्लाक बोर्ड वर लेखन आणि दिग्दर्शन करावयाचे असल्याने विद्यार्थी सुद्धा उत्सुकतेने नवोपक्रमात सहभागी होऊ लागली.सदर नवोपक्रम विद्यार्थ्यांना नवीन वाटत असल्याने इतर वर्गातील विद्यार्थी सुद्धा अनुकरणातून शिकु लागली.

शब्दांच्या किमयातून अभिव्यक्त होणे म्हणजे विचार व्यक्त करणे,लिहून बघणे,वाचता येणे ही सवय सातत्याने विद्यार्थ्यांमध्ये रुजू लागली.प्रोत्साहनासाठी शिक्षक पाठपुरावा करू लागले. लेखन आणि वाचन हे मानवी जीवनाला कलाटणी देणारा सर्वात महत्वाचा घटक आहे.बालकांच्या शैक्षणिक विकासाचा पाया वयोगट ६ ते ९ यामध्ये विशेषकरून रुजविल्या जातो.

विद्यार्थी जीवनात ही घडी अत्यावश्यक असल्याने ते कौशल्य आत्मसात करण्यासाठी नाविण्यपूर्ण सरावाची प्रक्रिया सुरू झाली. इयत्ता दुसरीतील सर्व विद्यार्थ्यांना शंभर टक्के वाचते करण्यासाठी शब्द,जोडाक्षर,वाक्य स्तर या पायाभूत स्तरांची पुर्तता होऊन इतर सर्व विषयांची गुणवत्ता वाढविण्यासाठी सदर नवोपक्रमाची गरज आहे.

विद्यार्थ्यांचे वाचन व लेखन स्तर उंचावण्यासाठी **निपुण भारत कार्यक्रम,फुलोरा उपक्रम** व इतर महत्वाचे उपक्रम राबविण्याची मोहीम शासनाने हाती घेतली आहे.

'अक्षर-शब्दांची किमया' या उपक्रमात इतरही वर्गातील विद्यार्थी आणि केंद्रातील इतर शाळांमधील विद्यार्थी अनुकरण करून सराव करून घेत आहेत.हीच या उपक्रमाची नाविन्यता आहे असे मला वाटते.

## २) नवोपक्रमाची उदिष्टे.

१) नवोपक्रमातून विद्यार्थ्यांची शब्द संपत्ती वाढविणे.

२) नवोपक्रमामधून अभिव्यक्ती मूल्यांची रुजवणूक करणे.

३) नवोपक्रमातून शिकण्याची रुची वाढविणे.

४) नवोपक्रमातून विद्यार्थ्यांना वाचन व लेखनाची कला संवर्धनाची जाणीव करून देणे.

५) नवोपक्रमातून विद्यार्थ्यांना इतर विषय हाताळण्याचे कौशल्य रुजविणे.

६) नवोपक्रमामधून विद्यार्थ्यांचे तणावमुक्त व आनंददायी शिक्षण.

७) विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वृद्धिंगत करणे.

८) नवोपक्रमातून विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे.

## ४-नवोपक्रमाचे नियोजन.

नवोपक्रमाच्या प्रभावी आणि परिणाम कारक अमलबजावणीसाठी शिक्षक व मुख्यध्यापक यांची नियोजन सभा घेण्यात आली. त्यांना किमया अक्षर शब्द समुहाची हा नवोपक्रम घेण्यासंदर्भात दैनंदिन कृती, संवाद, आंतरक्रिया घडवून आणण्यासाठी नियोजन करण्यात आले. शाळा भेटितून आपला थेट सबंध विद्यार्थी-शिक्षक व परिसराशी आला.

विषय साधनव्यक्ती म्हणून काम करताना अनेक शाळांना भेटी द्यावे लागतात,विशेष म्हणजे अभ्यासात मागे असलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी चे काम हे विषय साधनव्यक्ती यांचे मुख्य काम आहे.मग ते शाळाबाह्य विद्यार्थी,वयानुरूप दाखल विद्यार्थी,दिव्यांग विद्यार्थी, वंचित व गरीब घरातील विद्यार्थी,मजूर वर्गातील विद्यार्थी व विविध घटकातील विद्यार्थी असे सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांसाठी प्रभावी आणि परिणामकारक कामे करतांना, शाळांना वेळोवेळी भेटी

देताना, विविध विद्यार्थ्यांचे सूक्ष्म निरीक्षणाअंती असे लक्षात आले की विद्यार्थ्यांकडे शब्दसाठा कमी असल्यामुळे वाचन व लेखनात अडथळा निर्माण झाला आहे. त्यामुळे विद्यार्थी शैक्षणिक गुणवत्तेत मागे असल्याने गुणवत्तेवर त्याचा परिणाम झाल्याचे दिसून येत आहे.म्हणून मी तालुका संपर्क प्रमुख व विषय साधनव्यक्ती या भुमिकेतून भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जिल्हा परिषद उच्च प्राथमिक आदर्श शाळा गणपूर रै ची निवड करून निपुण भारत अभियान कार्यक्रमाला मदतगार ठरेल. कारण सदर नवोपक्रम हा इतर पारंपारीक उपक्रमापेक्षा वेगळा असल्याने ते स्विकृत ठरले. यासाठी शिक्षकांची आवर्जून बैठक घेऊन "अक्षर-शब्दांची किमया" हा नवोपक्रम राबविण्यासंदर्भात नियोजन तयार केले.वरिष्ठांशी चर्चा केली,पालकांच्या भेटी घेतल्या, फुलोरा उपक्रमाचा अनुभव सोबत असल्याने विद्यार्थ्यांच्या आवडीचा विषय हाती घेतला.

'शब्द माझे गुरू,आपणच समस्या निवारू' या उक्तीप्रमाणे काम सुरू केले.

## ५-नवोपक्रमाची कार्यपद्धती.

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा गणपूर रै येथे इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतचे वर्ग असून शाळेची एकुण पटसंख्या १६८ इतकी आहे.शब्दांचा साठा वाढ करण्यासाठी प्रायोगिक तत्त्वावर इयत्ता दुसरीच्या वर्गाची निवड करून नवोपक्रम हाती घेतला.समग्र शिक्षा उपक्रमात विद्यार्थ्यांना शिकण्याची व शिक्षणाची समान संधी दिल्या गेली आहे. विद्यार्थ्यांचे पायाभूत शैक्षणिक जीवन मजबूत व्हावेत,शाळेतील आणि वर्गातील विद्यार्थी कृती आदर्श व्हावी,शैक्षणिक वातावरण पोषक,आनंददायी,कृतीशील, प्रसन्न,आकर्षक,नैसर्गिक विद्यार्थी अनुकूल परिस्थिती निर्माण करण्यासाठी,२१ व्या शतकातील आव्हानांना सामोरे जात असतानाच विद्यार्थी हा चिकित्सक,विचारशील तयार व्हावा,मुलं शाळेत नियमितपणे टिकून राहावीत,रममाण होऊन उत्साहपूर्ण वातावरण निर्माण होण्यासाठी,शिकण्यातील अडथळे दूर करण्यासाठी, शिक्षकांची कार्यक्षमता, सकारात्मकता वाढून आत्मविश्वास वृद्धिंगत करण्याच्या हेतूने सुरवातीला इयत्ता दुसरीच्या २४ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.मुलांशी जवळीकता निर्माण करून संवाद,गोष्टी चर्चा,कथा,शैक्षणिक साहित्य इत्यादी पुरक साधनांचा वापर केला.सोबतच गटकार्य,वर्गकार्य,स्वाध्याय देऊन अनुकूल प्रतिसाद देणाऱ्या विद्यार्थांना भेटवस्तू देऊन प्रोत्साहित करण्यात आले.

काही मुलं आपल्या मुलभूत समस्या,अडचणी सांगायला संकोचतात,घाबरतात, त्यामुळे सर्व परिस्थितीचा सुक्ष्म विचार करून पोषक वातावरण आणि शिकण्याची इच्छा व गती विकसित करण्यासाठी पडताळणी नंतर हे सिद्ध झाले की "किमया अक्षर-शब्दांची" या नाविण्यपूर्ण नवोपक्रमाचा मुलांच्या शैक्षणिक गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी खूप उपयोग झाला.


**६--नवोपक्रमाची यशस्वीता.**

नवोपक्रमाची यशस्वीता तपासण्यासाठी त्याच शाळेत वारंवार भेटी देण्यात आल्या.भेटी दरम्यान सर्व विद्यार्थी मोठ्या उत्सुकतेने जवळ येऊ लागली,उपक्रमातून विद्यार्थी-विषय साधनव्यक्ती यांची अधिकाधिक जवळीकता निर्माण झाली.विद्यार्थी मनमोकळी चर्चा व संवाद साधु लागली.विशेष म्हणजे इयत्ता दुसरीतील २४ विद्यार्थी अक्षर-शब्दांची किमया या नवोपक्रमात सहभागी झाले आणि हळूहळू इतर वर्गातील सगळे विद्यार्थी अनूकरण करू लागली.

दरम्यान प्रथमतः दिनांक २८ आगष्ट-२०२३ रोजी इयत्ता दुसरीच्या सर्व विद्यार्थ्यांची अध्ययन स्तराची पडताळणी करण्यात आली.

पडताळणीसाठी अध्ययन निष्पत्तीवर आधारित स्टुल निर्धारित करण्यात आले.

| प्रारंभिक | अक्षर | शब्द | जोडाक्षर | वाक्य | परिच्छेद | अनुलेखन | श्रुतलेखन | अभिव्यक्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ० | ८ | १० | ६ | 0 | 0 | 11 | 12 | 9 |





**नवोपक्रमापुर्वीची स्थिती**

यामध्ये बरेच विद्यार्थी हे अक्षर स्तरावर होते,मागे असलेल्या विद्यार्थ्यांकडे शब्दसंग्रह कमी असल्याने वाचनात-लिहण्यात आणि बोलण्यात अडचणी दिसून आल्या.प्रत्येक

विद्यार्थ्यांमध्ये सुप्त शक्ती असते त्यांचा विकसन करणे गरजेचे असते. अध्ययन क्षमता विकसित झाले नसल्याने आत्मविश्वासाची कमतरता दिसून येत होती.

परंतु सदर नवोपक्रम हाती घेतल्यानंतर पालकांच्या भेटी,विद्यार्थी सराव व सातत्य ठेवल्याने,शिक्षक सहकार्य, विद्यार्थी बोलके व नवोपक्रमास अनुरूप असा प्रतिसाद मिळत असल्याचे बघून पालक समाधानी झाले.विद्यार्थी आत्मविश्वासाने प्रतिसाद देत आहेत हिच खरी या नवोपक्रमाची एक यशस्वीता आहे म्हणता येईल.ते खालील पडताळासूची वरुन सुद्धा दिसून येत आहे. **आपल्या उपक्रमाचा उपयोग गुणवत्ता वाढीसाठी कसा झाला ?** आपल्या कार्याचा हेतू आणि ध्येय उद्दिष्टेपूर्ती कडे घेऊन जाणारा असल्याने, नवोपक्रमात सातत्य ठेवल्याने, व्हॉट्स ॲप ग्रुप वर चर्चा केल्याने, प्रसार व प्रसिध्दी दिल्याने विद्यार्थी स्तर उंचावण्यासाठी सदर नवोपक्रमाचे बिजारोपन झाले. हे दिनांक 07/11/2023 ला घेण्यात आलेल्या अध्ययन स्तर चाचणीवरुन दिसून आले.

| प्रारंभिक | अक्षर | शब्द | जोडाक्षर | वाक्य | परिच्छेद | अनुलेखन | श्रुतलेखन | अभिव्यक्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 0 | 0 | 6 | 9 | 7 | 2 | 16 | 17 | 15 |




**नवोपक्रमानंतरची स्थिती**

आदर्श शाळेचा तालुका संपर्क प्रमुख तथा विषय साधनव्यक्ती म्हणून माझी नैतिक जबाबदारी ही आदर्श शाळेची गुणवत्ता वाढविणे हेच असल्याने मी आपली धारणा पक्की केली, ध्येय निश्चित केले आणि ती अविरत जोपासून आपल्या कृतीत उतरवले.पूर्वीचे जी आव्हाने आणि अडचणींचा अभ्यास करून सर्वांना सोबत घेत सहजपणे प्रत्येक टप्प्यावर

काम केल्यामुळे विद्यार्थी शाळेत नियमितपणे हजर राहु लागली.धिटपणाने व्यक्त होत आहेत,चर्चेत सहभागी होतात, शिकण्याची रूची वाढली."अक्षर-शब्दांची किमया" या नवोपक्रमामुळे ही उदिष्टे साध्य करता आले.नवोपक्रमाच्या सकारात्मक यश आणि विद्यार्थी बदलाची माहिती शिक्षक आणि पालक यांना देण्यात आली.एकंदरीत 'अक्षर-शब्दांची किमया' या नवोपक्रमामुळे शिकण्यातील अडथळे दूर झाली,विद्यार्थी गुणवत्तेत वाढ झाल्याचे शिक्षक व पालक सांगतात.

**७) समारोप –**

मुलं घरून,परिसरातून,समाजघटकातून,सामाजिक वातावरणातून शाळेत जेव्हा येतात तेव्हा ती शिक्षकांच्या सहवासात असतात.मुले शाळेत कशासाठी येतात?हे प्रत्येक घटकाला माहीत असायलाच हवे. घाबरलेली,भांबावलेल्या मुलांना नवोपक्रमातून बळ देणे हे प्रत्येकाचे अंतिम ध्येय असावेत.या उपक्रमाचा मुख्य उद्देश हा होता की, आपल्या आदर्श कृती आणि नियोजनबद्ध नवोपक्रम पद्धतीने विद्यार्थ्यांच्या अक्षर- शब्द संपत्तीत वाढ करून स्वयंलेखन करता येणे,शब्दांच्या अर्थछटा लक्षात घेऊन अर्थपूर्ण वाक्य तयार करता येणे,वाचन व लेखनाची आवड निर्माण करणे,अध्ययन स्तरात बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न करणे,नियमित सरावाने वाचन संस्कृतीत सुधारणा करून शैक्षणिक गुणवत्तेत वाढ करणे हा असल्याने त्या संदर्भात काही नोंदी घेतल्या गेल्या आहेत.त्यामुळे विद्यार्थी नियमित शाळेत यायला लागले आणि शाळेत रमू लागले.वातावरण पोषक असेल तरच शाळेतील शिक्षकांचे आणि वर्गातील विद्यार्थ्यांचे मनोबल वाढत असते याऊलट वातावरण पोषक नसल्यास त्याचा अनिष्ट परिणाम शालेय घटकांवर होत असल्याचे दिसून येते.

इतकेच नव्हे तर, शालेय अभ्यासाकडे लक्ष देऊ लागल्याने सराव व सातत्याने त्याच्यामध्ये अभ्यासाची गोडी निर्माण झाली.वाचनातील व लेखनातील चढाव उतार लक्षात आले.समज,ज्ञान,आकलन व दृष्टीकोन बदलला.लिखाण कार्यात सुधारणा झाल्याचे दिसून येत आहे हेच या नवोपक्रमाचे खरे महत्त्व आणि सुलभकांची हिच खरी संपत्ती आहे.

सुलभकाने अगदी प्रामाणिकपणे राबवलेले विविध उपक्रम,नवोपक्रम, प्रत्येक कृती,खेळ,मग ते सर्वसाधारण असो वा शैक्षणिक,विद्यार्थी वर्तनाला, बदलायला कळत नकळत प्रेरित ठरत असते.विद्यार्थी शिकण्यासाठी मदतगार ठरते.अक्षर-शब्दांची किमया या नवोपक्रमामुळे शाळेतील विद्यार्थ्यांच्या शालेय गुणवत्ता वाढ झाल्याचे शाळेतील व केंद्रातील इतर शाळांमधील शिक्षक सांगतात. त्यामुळेच केंद्रातील 12 शाळांमधिल जवळपास 689 विद्यार्थी आणि 34 शिक्षक या नवोपक्रमाचा लाभ घेत आहेत.

## ८--संदर्भसूची.

१) निपुण भारत अभियान कार्यक्रम.शासननिर्णय दिनांक २७.१०.२०२१

२) जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था गडचिरोलीचे मार्गदर्शन.

३) फुलोरा उपक्रम व प्रशिक्षण.

४) भाषा साहित्य पेटीतील साहित्य. (माझा शब्द संग्रह)

५) करू या मैत्री शब्द समुहाशी

**आपला**

श्री. चांगदेव खुशाल सोरते

विषय साधनव्यक्ती, गटसाधन केंद्र चामोर्शी

जि. गडचिरोली

## शिक्षक व मुख्याध्यापक यांची नियोजन सभा




## उपक्रमात सहभागी विद्यार्थी




जि. प. उच्च प्राथ.
गणपूर रै.
माझा उपक्रम :-
माझे शब्द
स




शब्दांची किमया नवोपक्रमात
शब्दांची जुळवाजुळव करण्याची
धडपड


Moon
Monday
May
My
Me
Monkey
Mango
Mat
Marigold



# प्रतिज्ञापत्र

मी **श्री चांगदेव खुशाल सोरते** प्रतिज्ञापत्र लिहून देतो की, या नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला **"किमया अक्षर-शब्दांची"** हा नवोपक्रम माझ्या स्वतःच्या शैक्षणिक उपक्रमावर, अनुभवावर आधारित आहे. हा नवोपक्रम मला स्वतःला सुचलेला आहे. काल्पनिक नाही. तसेच भारतीय अथवा विदेशी लेखकांच्या ग्रंथातील अथवा संशोधनातील माहितीच्या आधारे हा नवोपक्रम लिहिलेला नसून यामध्ये मला जाणवलेल्या समस्येचा सूक्ष्म अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. हा नवोपक्रम यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही. तसेच इतर कोणत्याही व्यक्तीकडून लिहून तो मी माझ्या नावावर सादर केलेला नाही. तसे आढळून आल्यास तो Copyright Act 1957 खाली दाखलपात्र गुन्हा आहे याची मला कल्पना आहे.

**स्पर्धकाची स्वाक्षरी**
**नाव- चांगदेव खुशाल सोरते**
**विषय साधनव्यक्ती**
**गट साधन केंद्र चामोर्शी**

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा गणपूर (रै.)
## केंद्र-गणपूर , पं.स.चामोर्शी

---

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, **श्री चांगदेव खुशाल सोरते** हे **गट साधन केंद्र चामोर्शी** या कार्यालयात कार्यरत असून त्यांनी माझ्या शाळेत सादर केलेला **"किमया अक्षर-शब्दांची"** हा नवोपक्रम शैक्षणिक वर्ष 2023-24 मध्ये त्यांनी स्वतः राबविलेला असून ती त्यांच्या स्व-परिश्रमाची फलश्रुती आहे. त्यांच्या नवोपक्रमाचा फायदा शाळा स्तर व केंद्र स्तरावरील विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना झालेला आहे. हा नवोपक्रम त्यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत आयोजित यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.

**दिनांक** : 24-11-2023
**स्थळ** : चामोर्शी

**शाळा प्रमुखाची स्वाक्षरी**
**नाव- अमितकुमार बारसागडे**
**मुख्याध्यापक**
**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर**
**आदर्श शाळा गणपूर (रै.)**

# समग्र शिक्षा, गट शिक्षणाधिकारी कार्यालय
## गट साधन केंद्र, पं.स.चामोर्शी

---

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, **श्री चांगदेव खुशाल सोरते** हे माझ्या कार्यालयात कार्यरत असून त्यांनी सादर केलेला **"किमया अक्षर-शब्दांची"** हा नवोपक्रम शैक्षणिक वर्ष 2023-24 मध्ये त्यांनी शाळा स्तरावर स्वतः राबविलेला असून ती त्यांच्या स्व-परिश्रमाची फलश्रुती आहे. त्यांच्या नवोपक्रमाचा फायदा शाळा स्तर, केंद्र स्तर व तालुका स्तरावरील विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना झालेला आहे. हा नवोपक्रम त्यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत आयोजित यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.

**दिनांक** : 24-11-2023
**स्थळ** : चामोर्शी

**कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी**
BLOCK EDUCATION OFFICER
Block Resource Centre, Chamorshi
**नांव- नरेंद्र मस्के**
**गट शिक्षणाधिकारी**
**गट साधन केंद्र चामोर्शी**